**“फेब्रवारी २०२१” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक १ फेब्रुवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये अखिल भारतीय सेवेतील, राज्य सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादींचे अधिकारी / पदाधिकारी यांच्या विदेश दौऱ्यासंबंधीचे निकष, सूचना व कार्यपद्धतीचे आदेश एकत्रितरित्या विहित करण्यात आले आहेत.
- दिनांक १ फेब्रुवारी २०२१ च्या शासन पत्रान्वये आस्थापना मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावासाठी तपासणीसूची विहित करण्यात आली आहे.
- दिनांक ४ फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये सीपीटीपी-४/अ अंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या मंत्रालयीन कक्ष अधिकारी, गट-ब संवर्गामध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आलेल्या ७ पदांपैकी सध्या कार्यरत असलेल्या ६ अधिसंख्य पदांना दिनांक २१ जानेवारी २०२१ पासून पुढे सीपीटीपी-४अ मधील गट-ब प्रशिक्षणार्थी परिविक्षाधीन अधिकाऱ्यांची तात्पुरती सेवा ज्येष्ठता तयार होण्याच्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक १० फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार सामान्य प्रशासन विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई या विभागातील गट-ड संवर्गातील “शिपाई” हे पद सुनिश्चित करण्यात आले आहे.
- दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील पदांकरिता दिव्यांगासाठी शासन सेवेत पदे सुनिश्चित करण्यात आली आहेत.
- दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार सामान्य प्रशासन विभागांतर्गत यशदा, पुणे या संस्थेतील गट-अ, गट-ब, गट-क, गट-ड संवर्गातील दिव्यांगासाठी पदे सुनिश्चित करण्यात आली आहेत.
- दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीतील लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य या कार्यालयातील गट-अ, गट-ब, गट-क, गट-ड संवर्गातील दिव्यांगासाठी पदे सुनिश्चित करण्यात आली आहेत.
- दिनांक १7 फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार मंत्रालय उपाहारगृहे यांच्या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील दिव्यांगासाठी पदे सुनिश्चित करण्यात आली आहेत.
- दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील ३१५ अस्थायी पदे दिनांक ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आली आहेत.
- दिनांक २३ फेब्रुवारी २०२१ च्या शासन पूरक पत्रान्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींच्या अनुषंगाने आढावा घेण्याबाबतच्या दिनांक २० ऑक्टोबर २०२० च्या शासन परिपत्रकामध्ये विवरणपत्र १६अ व १६ब चा समावेश करण्यात आहे.
- दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ (सीपीटीपी-३) अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या उपमुख्य अधिकारी / गट विकास अधिकारी, गट-अ मधील ३ अधिकाऱ्यांचा दिनांक ३० एप्रिल २०१८ पासून परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय उपाहारगृहातील उधार पतविक्री रकमांच्या प्रदानाबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.
- दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या अनुषंगाने मंत्रालय (खुद्द) व बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील गट-अ ते गट-क या संवर्गातील पदे सुनिश्चित करण्यात आली आहेत.

### (ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त

- भारतीय प्रशासन सेवेतील १७ अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.
- एका कक्ष अधिकाऱ्याला कार्यमुक्त करण्यात आले आहे.

### (ग) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन

- एका कक्ष अधिकाऱ्याला प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली आहे.
- एका कक्ष अधिकाऱ्याचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- दोन कक्ष अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

### (घ) पदोन्नती

- एका शिपायाने लिपिक-टंकलेखक पदी दिलेली पदोन्नती नाकारली आहे.

### (च) ज्येष्ठतासूची

- दिनांक १५ फेब्रवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ३७ निवडश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १५ फेब्रवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ३१ निम्नश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १५ फेब्रवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ४९६उच्चश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १५ फेब्रवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील १६ वरिष्ठ स्वीय सहायकांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १५ फेब्रवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील ४५ लघुटंकलेखकांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १६ फेब्रवारी २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील १८०७ लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०२१ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****